क्र. :- पोमसं/२८-अे/४९३७/महिला पोलीस-विशेष पोषण अनुदान/३३(०२) /२०१८. मुंबई, दि. २३/०२/२०१८

विषय :- महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील महिला सक्षमीकरणाच्या पार्श्वभूमीवर गर्भवती महिलांना विशेष पोषण आहार रु.५,०००/- इतकी रक्कम व मुलगी झाल्यास तिच्या पोषणासाठी अतिरिक्त रु.५,०००/- इतकी रक्कम सुदृढ बालिका अनुदान देण्याबाबत -

***********

शासन सेवेतील महिलांचे प्रमाण ३०% करण्याच्या शासनाच्या धोरणानुसार महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील महिल अधिकारी/कर्मचा-यांची संख्या वाढत आहे. पोलीस दलातील कामाची पध्दत व वेळेच्या अनियमिततेमुळे सर्व पोलीसांवर मानसिक ताण तर असतो, त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचे वैद्यकीय तपासणी अहवालाच्या विश्लेषणावरुन निदर्शनास आले आहे.

या बाबींचा विचार करुन महिला पोलीसांच्या पहिल्या प्रसुतीच्या काळात तिचा व तिच्या होणा-या बाळाच्या आरोग्याचा दर्जा वाढविण्याच्या हेतूने विशेष पोषण आहार घेता यावा, याकरिता पोलीस कल्याण निधीतून पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक या पदावरील महिला पोलीसांना त्यांच्या गरोदरपणात 'विशेष पोषण आहार अनुदान' देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. गरोदर अवस्थेत पोलीस अधिकारी/कर्मचारी महिलांचे योग्य रितीने पोषण होण्यासाठी व महिला सक्षमीकरणाच्या पार्श्वभूमीवर महिला कर्मचा-यांना पहिल्या गरोदरपणात रु. ५,०००/- इतके विशेष पोषण आहार अनुदान घटकांच्या पोलीस कल्याण निधीतून गरोदर काळात अर्ज केल्यावर देण्यात यावे. तसेच जन्मास आलेले अपत्य हे मुलगी असल्यास, बेटी बचावच्या पार्श्वभूमीवर व मुलीचा जन्मदर वाढण्यास प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने तिच्या पोषणासाठी देखील वरील अनुदाना व्यतिरिक्त रु. ५,०००/- इतके 'सुदृढ बालिका अनुदान' या नावाने संबंधीत घटकांच्या पोलीस कल्याण निधीतून सदर महिला अधिकारी/कर्मचारी यांना देण्यात यावे.

(सतीश माथुर)
पोलीस महासंचालक
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह)
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग सहीत)
सर्व समादेशक, रा.रा.पो.बल गट क्र.१ ते १४
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालये (रा.रा.पो.प्र.केंद्र, नानवीज-दौंडसह)
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक / महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक, रा.रा.पो.बल, पुणे / नागपूर
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर

**१९१७ /User/Desktop/ D esk २८-A/desk २८-a.doc**

Scanned by CamScanner

(16)

**तातडीचे :-**

क्र.पोकनि/२८-ओ/४९३७/लिपीक महिला कर्मचारी/३३(०२)/२०१८ मुंबई, दि०२०६.२०१८

**विषय :-** महाराष्ट्र राज्य पोलीस दलात कार्यरत असलेल्या व पोलीस कल्याण निधीचे सभासद असलेल्या लिपीक वर्गीय महिला कर्मचारी यांना विशेष पोषण आहार व सुदृढ बालिका अनुदान देण्याबाबत.

******

**परिपत्रक :-**

महाराष्ट्र राज्य पोलीस दलात कार्यरत असलेल्या व पोलीस कल्याण निधीचे सभासद असलेल्या लिपीक वर्गीय महिला कर्मचारी यांच्या सक्षमीकरणाच्या पार्श्वभूमीवर गर्भवती महिलांना पहिल्या प्रसृतीच्या काळात तिचा व तिच्या होणा-या बाळाच्या आरोग्याचा दर्जा वाढविण्याच्या हेतुने विशेष पोषण आहार घेता यावा. याकरीता पोलीस कल्याण निधीतून लिपीक वर्गीय महिला कर्मचारी यांना त्यांच्या गरोदरपणात " **विशेष पोषण आहार अनुदान** " देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

गरोदर अवस्थेत लिपीक वर्गीय महिलांचे योग्य रितीने पोषण होण्यासाठी व महिला सक्षमीकरणाच्या पार्श्वभूमीवर लिपीक वर्गीय महिला कर्मचा-यांना पहिल्या गरोदरपणात रु.२,५००/- इतके विशेष पोषण आहार अनुदान घटकांच्या पोलीस कल्याण निधीतून गरोदर काळात अर्ज केल्यावर देण्यात यावे. तसेच जन्मास आलेले अपत्य हे मुलगी असल्यास, बेटी बचावच्या पार्श्वभूमीवर व मुलीच्या जन्मदर वाढण्यास प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने तिच्या पोषणासाठी देखील वरील अनुदाना व्यतिरिक्त रु.२,५००/- इतके " **सुदृढ बालिका अनुदान** " या नावाने संबंधित घटकांच्या पोलीस कल्याण निधीतून सदर लिपीक वर्गीय महिला कर्मचा-यांना देण्यात यावे.

२९/६/१८

( डॉ. प्रज्ञा सरवदे )
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन),
पोलीस महासंचालक यांचे करिता.

**प्रति,**

महासंचालक, ॲंटी करप्शन ब्युरो, म.रा., मुंबई (सस्नेह अग्रेषित)

अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा.,पुणे / प्रशिक्षण व खास पथके / रा.रा.पो.बल / वाहतूक / लोहमार्ग / विशेष कृती / द.वि.प., मुंबई.

अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश, म.रा., पुणे.

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा., मुंबई

सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह) (बृहन्मंबई वगळून)

संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक / महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे

विशेष पोलीस महानिरीक्षक, नागरी हक्क संरक्षण, म.रा., मुंबई/ न.वि.अ.,नागपूर/ फोर्स वन,मुंबई

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक

विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, म.रा., पुणे

| पोलीस अधीक्षक कार्यालय उस्मानाबाद | |
|---|---|
| पो.अ. | |
| अपर पो.अ. | |
| पो.उप अ.(मु.) | |
| का.अ. | |
| प्र.लि. | |
| शाखा | C.B.TA |
| आवक क्र. | 10226 |

13 JUN 2018

Scanned by CamScanner